ARTHA Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २३ पुणें, बुधवार तारीख १८ डिसेंबर, १९५७ अंक ४७

## विविध माहिती

**गिरण्यांची रात्रींची पाळी बंद**—भावनगर येथील दोन कापडाच्या गिरण्यांच्या व्यवस्थापकांनीं अशी नोटीस काढली आहे कीं, १ जानेवारीपासून गिरण्यांतील रात्रींची पाळी बंद करण्यांत येणार आहे. कापडाला मागणी नसल्यामुळें गिरण्यांच्या गुदामांत कापड पडून असल्याचें कारण दाखविण्यांत आलें आहे. रात्रींची पाळी बंद झाल्यास २,००० कामगार बेकार होतील.

**बुद्धधर्मावरील पुस्तकें**—ब्रह्मदेशाचे मुख्य प्रधान श्री. उ नू ह्यांनीं भारताच्या महाबोधी सोसायटीला असें आश्वासन दिलें आहे कीं, बुद्धधर्मावरील वाङ्मयाचा आपण पुरस्कार करूं. हें वाङ्मय हिंदी, गुजराती, मराठी, बंगाली आणि तामीळ भाषांत प्रसिद्ध करून सोसायटीतर्फे मोफत वाटण्यांत यावें, अशी त्यांची कल्पना आहे.

**जपान-अरबस्तान करार**—जपान व अरबस्तान ह्या दोन देशांच्या दरम्यान तेल उपसण्याच्या हक्कासंबंधीं एक करार झाल्याची बातमी आहे. मध्यपूर्वेंतील तेल काढण्याच्या हक्कासंबंधीं इंग्लंड व अमेरिका ह्यांची स्पर्धा आहे. त्यांत आतां जपानची भर पडली आहे. जपाननें केलेल्या कराराच्या अटी अजून जाहीर झालेल्या नाहींत.

**रशिआच्या उपग्रहाचें परिभ्रमण**—रशिआनें सोडलेल्या पहिल्या बालचंद्रानें १० डिसेंबरपर्यंत पृथ्वीभोंवतीं १,००० प्रदक्षिणा पुऱ्या केल्या. ता. ४ ऑक्टोबरला तो अंतरिक्षांत सोडण्यांत आला. तेव्हांपासून त्यानें २७ कोटी मैल परिभ्रमण केलें आहे. हें अंतर पृथ्वीपासून शुक्र जितक्या अंतरावर आहे तितकें आहे.

**भात वाढण्यास मनाई ?**— देशांतील तांदुळाची टंचाई लक्षांत घेऊन मद्रास सरकार हॉटेल्समधून रात्रीच्या जेवणाच्या वेळीं भात वाढण्यास मनाई करण्याचा विचार करीत आहे. ही मनाई हळूहळू करण्यांत येईल. त्याचप्रमाणें लोकांनीं आपल्या खाण्याच्या संवयी बदलून गहूं खाण्यास शिकावें म्हणूनहि प्रयत्न करण्यांत येणार आहेत.

**राज्य घटनेचें हिंदी भाषांतर**—भारताच्या राज्य घटनेचें अद्यावत हिंदी भाषांतर तयार करण्याचें काम चालूं आहे. तें बहुधा चालू महिन्याच्या असेरीस प्रसिद्ध करण्यांत येईल. हिंदी-प्रमाणेंच उर्दू भाषेंतील भाषांतरहि चार-पांच महिन्यांच्या अवधींत प्रसिद्ध करण्यांत येणार आहे. मल्याळी भाषेंतील तर्जुमा केरळचें सरकार लवकरच प्रसिद्ध करणार आहे.

**मलायांतील युद्धाचा खर्च**—मलायांतील ब्रिटिश सरकार व स्थानिक दहशतवादी ह्यांच्यांत १९४९ पासून ऑगस्ट १९५७ पर्यंत सतत युद्ध चालूं होतें. ह्या काळांत ब्रिटिश सरकारला सुमारें ५॥ कोटी पौंड खर्च आला, अशी माहिती ब्रिटनचे संरक्षण मंत्री मि. डंकन सँडीज ह्यांनीं पार्लमेंटमध्यें दिली.

**सीलोनकडून चहाची खरेदी**—कोलंबो येथें होणाऱ्या चहाच्या लिलावांत बोलण्यास रशिआनें सुरवात केली आहे. आतांपर्यंत रशिआनें सीलोनकडून २० लाख पौंड उत्तम प्रतीचा चहा खरेदी केला आहे. खरेदी केलेल्या चहाची वहातूक करून तो मॉस्को व ओडेसा ह्या बंदरांत पोंचविण्यासाठीं पोलंडची एक बोट कोलंबो बंदरांत आली आहे.

**जपानला लोखंडाची निर्यात**—जपानच्या तंत्रज्ञांचें एक मंडळ रूरकेला येथें गेलें आहे. ह्या भागांतील अशुद्ध लोखंड विशाखापट्टम बंदराच्या मार्गें जपानला कसें नेतां येईल, ह्यासंबंधीं तें पहाणी करीत आहे. पुढच्या वर्षाच्या प्रारंभापासून जपानला ह्या मार्गानें दरसाल ६० लाख टन अशुद्ध लोखंडाचा पुरवठा करण्यांत येईल, असा अंदाज आहे. पुरवठ्यासंबंधीं ७ वर्षांचा करार करण्यांत येईल.

**बोकारो येथें नवा पोलादकारखाना**— बिहारमधील बोकारो ह्या ठिकाणीं पोलादाचा आणखी एक कारखाना काढण्याच्या दृष्टीनें जागेची आखणी करण्यांत येत आहे. हा कारखाना तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट करण्यांत येणार आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत भिलई, दुर्गापूर व रूरकेला हे तीनच पोलादाचे कारखाने उभारण्यांत येतील अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## महागाई भत्ता

( मागील अंकावरून समाप्त )

### रहाणी-खर्चाच्या निर्देशांकानुसार महागाईभत्ता

राहणीखर्चाच्या निर्देशांकानुसार महागाईभत्ता देण्याची पद्धति या ना त्या स्वरूपांत बऱ्याच धंद्यांत, विशेषतः असे निर्देशांक उपलब्ध असलेल्या धंद्यांत स्वीकारण्यांत आलेली आहे. या पद्धतीचा विशेष म्हणजे निर्देशांकांच्या चढउतारानुसार महागाईभत्त्यांतहि तसा बदल आपोआपच होतो व त्यामुळें मालक व कामगार या दोघांनाहि विश्वास वाटतो. या पद्धतीचे अनेक प्रकार आहेत. सर्व श्रेणींतील कामगारांना द्यावयाच्या महागाईभत्त्याचा दर समान ठरवून राहणीखर्चाच्या निर्देशांकाशीं तो निगडित करणें ही बहुतांशी स्वीकारलेली पद्धति आहे. मुंबई औद्योगिक न्यायालयानें अहमदाबाद येथील सुती कापड गिरण्यांतील कामगारांनीं केलेल्या मागणीसंबंधांत या पद्धतीची प्रथम शिफारस केली. ही पद्धति सुती कापड गिरण्यांच्या बहुतेक सर्व केंद्रांत अस्तित्वांत असून, त्यानुसार एका विशिष्ट पातळीनंतर निर्देशांकांत होणाऱ्या वाढीसाठीं प्रत्येक अंशाकरतां भत्त्याचा विशिष्ट दर ठरविण्यांत आलेला आहे. म्हणजेच, कमी वेतनाच्या गटांतील कामगारांना जास्त वेतनगटांतील कामगारांपेक्षा मिळणाऱ्या महागाई भत्त्यांचें प्रमाण जास्त असतें.

विशेषतः राहणीखर्चाचा निर्देशांक आधारभूत धरून महागाई-भत्त्याचा दर निश्चित करतांना या खर्च वाढीची भरपाई किंपत करावी या गोष्टीचा विशेष विचार करावा लागतो. लवादांनीं व न्यायमंडळांनीं अशा पातळ्या केवळ वेगवेगळ्या केंद्रानुसारच निरनिराळ्या ठरविल्या आहेत असें नसून, एकाच केंद्रांतहि वेळोवेळीं त्या वेगवेगळ्या स्वीकारलेल्या आहेत. या भरपाईचें प्रमाण त्यांनीं संबंधित उद्योगधंद्यांच्या वा कारखान्यांच्या आर्थिक पात्रतेचा अंदाज बांधून ठरविलेलें आहे. निरनिराळ्या निवाड्यां-मध्यें राहणीमानाच्या खर्चानुसार निरनिराळ्या प्रमाणांत भरपाई देण्याची तरतूद असली तरी १०० टक्के भरपाई देण्यास १९४८ पासून कोणत्याहि लवादानें अनुमति दर्शविलेली नाहीं.

कारखान्याची पैसे देण्याची शक्ति ही कांहीं नेहमींच निर्णायक बाब म्हणून मानण्यांत आली नव्हती. त्या संबंधित कारखान्यांत चालू असलेलें वेतनप्रमाण आणि त्या विशिष्ट विभागांतील कामगारांच्या तत्सम श्रेणींतील सर्वसाधारण पातळी या गोष्टींचाहि महागाईभत्ता ठरवितांना विचार करण्यांत येत असे.

### पुरुष व स्त्रिया ह्यांच्यांत भेद

पुरुष आणि स्त्री-कामगारांना सामान्यतः सारखाच महागाई भत्ता देण्यांत येत असला तरी कांहीं थोड्या प्रकरणीं पुरुषांना आणि स्त्रियांना वेगवेगळा महागाईभत्ता देण्याचा लवादांनीं निवाडा दिलेला आहे. उदाहरणार्थ, प. बंगालमधील ३६ कापूस गिरण्यांत पुरुष कामगारांना दिलेल्या महागाईभत्त्याच्या ३/४ भत्ता स्त्री-कामगारांना देण्यांत आला. पुढील कारणास्तव मंडळानें हा निर्णय घेतला असावा. ( १ ) बाळंतपणांत मिळणारे फायदे आणि खास स्त्री-कामगारांसाठीं असलेल्या कल्याणकारी योजना यांमुळें मालकांवर पडणारा जादा ताण, ( २ ) पुरुष कामगारांपेक्षा स्त्री कामगारांवर अवलंबून असणारांचें अल्प प्रमाण आणि ( ३ ) पुरुष कामगारांपेक्षा स्त्री-कामगारांची कमी असलेली सहनशक्ति.

परंतु महागाईभत्त्याचे बाबतींत पुरुष आणि स्त्रिया असा भेद करूं नये अशाच प्रकारचा सर्वसाधारणपणें कल दिसून येतो.


५०
वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान
★ सरदारगृह ★
प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
समासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

अन्नाचें रहस्य


बेडेकर मसाले, लोणचीं, पापड
ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.
★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेंडीव, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्यांची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली ४ सहकार


किर्लोस्कर
इलेक्ट्रिक पंपिंग सेट
यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी, द. सातारा

# अर्थ

बुधवार, ता. १८ डिसेंबर, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## शेड्यूल्ड बँकांनीं दिलेलीं कर्जें

शेड्यूल्ड बँकांनीं दिलेल्या कर्जाचें एकूण रकमेंत वाढ होत आहे, त्याबरोबर त्या बँकांनीं कारखान्यांना दिलेलीं कर्जेंहि वाढत आहेत. पंचवार्षिक योजनेच्या उद्दिष्टांना हें धरूनच आहे. कर्ज अजूनहि व्यापारालाच मोठ्या प्रमाणावर दिलें जात आहे, हें व्यापाराचें इतर व्यवहारांपेक्षा आजचें अधिक महत्त्व सिद्ध करीत आहे. वास्तविक, व्यापाराचे मानानें कारखानदारी व शेती ह्यांचाहि हिस्सा वाढला पाहिजे. जून, १९५४ मध्यें व्यापाराला २५७ कोटी रुपये देण्यांत आले होते; जून, १९५७ मध्यें ती रक्कम ४१४ कोटी रुपये झाली. तथापि, एकूण कर्जाशीं व्यापाराला दिलेल्या कर्जाचें प्रमाण ४९% वरून ४५% वर उतरलें आहे. शेतमालाच्या घाऊक व्यापाऱ्यांना दिलेल्या कर्जांत मंद गतीनें वाढ झाली. जून, १९५४ ते जून, १९५७ ह्या मुदतींत कारखानदारांना दिलेलीं कर्जें १००% नें वाढलीं; १९३ कोटी रु. वरून तीं ३९० कोटी रुपयांवर गेलीं. जून, १९५४ मध्यें, कारखानदारांना दिलेल्या कर्जाचें एकूण कर्जाशीं प्रमाण ३४% होतें, तें जून, १९५५ मध्यें व जून, १९५६ मध्यें ३९% झालें आणि जून, १९५७ मध्यें तें ४२% वर गेलें. जून, १९५४ नंतर बँकांचीं कर्जें ३६० कोटी रुपयांनीं वाढलीं, त्यांपैकीं २०० कोटी रुपयांचीं म्हणजे ५५% कर्जें कारखान्यांना मिळालीं. सिमेंट, लोखंड व पोलाद, इंजिनिअरिंग, ह्या वाढत्या उद्योगांनीं अधिक कर्जें घेतलीं. कापडाच्या गिरण्यांनाहि ज्यास्त कर्जें मिळालीं.

### कर्जांची वर्गवारी

( कोटी रु. )

| | जून १९५४ | जून १९५५ | जून १९५६ | जून १९५७ |
|---|---|---|---|---|
| कारखाने | १९२.९ | २४१.२ | ३००.४ | ३९०.४ |
| व्यापार | २७५.० | २९२.३ | ३५६.३ | ४१४.३ |
| शेती | १५.७ | १२.५ | १७.७ | २२.९ |
| वैयक्तिक व व्यावसायिक | ४५.३ | ५४.८ | ५८.२ | ६१.१ |
| इतर | ३५.५ | २४.९ | ३१.३ | ३६.३ |
| एकूण | ५६४.५ | ६२५.६ | ७६३.९ | ९२५.० |

## मच्छीमारीच्या धंद्याला चांगला वाव

भारताला अजून कांहीं काळ अन्नधान्याच्या तुटवड्याच्या परिस्थितीला तोंड द्यावें लागणार आहे. अन्नाच्या तुटवड्यांतून मार्ग काढण्यासाठीं निरनिराळे उपाय सुचविले जातात. त्यांत अधिक मासे खाण्याच्या उपायाचाहि निर्देश केला जातो. पण त्यासाठीं मच्छीमारीच्या धंद्याची वाढ होणें आवश्यक आहे. भारताच्या लांबच लांब पसरलेल्या किनाऱ्यावर मच्छीमारीचा धंदा करण्यांत येतो. तथापि, त्याचीं साधनें मागासलेलीं असल्यानें व इतर कारणांनीं तो किफायतशीर होणें कठीण जातें. ह्या धंद्याच्या विकासासाठीं नॉर्वेसारख्या पुढारलेल्या देशाचें साह्य घेण्यांत येत आहे. नॉर्वेच्या मच्छीमारी खात्याचे मंत्रि मि. निल्स लिसे हे सध्यां भारतांत आले आहेत. त्यांनीं नुकतीच केरळ राज्याला भेट दिली. नॉर्वेच्या सरकारच्या तांत्रिक मदतीनें केरळमधील आधुनिक साधनांनीं चालविण्यांत येणाऱ्या एका मच्छीमारी केंद्राचा विकास करण्यांत येत आहे. ह्या केंद्राला भेट दिल्यानंतर मि. लिसे म्हणाले कीं, ह्या धंद्याचा अधिक विस्तार करण्यास भारतांत खूपच वाव आहे. यांत्रिक साधनांनीं युक्त अशा प्रकारच्या मच्छीमारीच्या बोटींचा उपयोग करणें मात्र आवश्यक आहे. केरळमध्यें चालविण्यांत येत असलेल्या केंद्राला कोळी व इतर कामगार ह्यांचें चांगलें सहकार्य मिळत आहे. हे लोक आपल्या कामांत चांगलें कौशल्य प्रगट करीत असून त्यांचा उत्साहहि भरपूर आहे. मच्छीमारीच्या मोठ्या मोटारी वापरण्यांत आल्यास समुद्रांत दूरवर जाऊन मासे पकडतां येतील. मासे पकडल्यावर त्यांची विक्री करण्याची योग्य व्यवस्थाहि झाली पाहिजे.

## भारताच्या परराष्ट्रीय व्यापारांत विदेशीयांचा मोठा हात

भारताच्या परराष्ट्रीय व्यापारांत परदेशी नियंत्रणाखालील कंपन्यांचा केवढा तरी मोठा हात आहे ! ह्या कंपन्यांनीं १९५६ मध्यें २०० कोटि रुपयांचा माल निर्गत केला; म्हणजे खासगी व्यापारी निर्गतीपैकीं ३०% निर्गत त्यांनीं केली. त्या निर्गतींत एकट्या चहाचीच किंमत १०० कोटी रुपयांपेक्षा अधिक होती. चहा हा जिन्नस आपल्याला परदेशी हुंडणावळ मिळवून देण्यांत प्रमुख आहे. पण ह्या चहाच्या एकूण निर्गतीपैकीं ७२% निर्गत परदेशीयांच्या नियंत्रणाखालीं आहे. चहाच्या धंद्यांत गुंतलेलें भांडवल बव्हंशीं परदेशी मालकीचें आहे, त्याचा हा परिणाम आहे. दुसरा जिन्नस ह्या कंपन्यांनीं मोठ्या प्रमाणावर निर्गत केला, तो म्हणजे ताग हा होय. त्याचे खालोखाल तंबाखूचा अनुक्रम येतो.

भारताच्या खासगी ( बिनसरकारी ) मार्गानें झालेल्या आयातीपैकीं १९७ कोटी रुपये किंमतीच्या मालाची आयात (२५%) परदेशी नियंत्रणाखालील कंपन्यांनीं केली. ह्या १९७ कोटि रुपयांच्या मालापैकीं ७२ कोटि रुपयांचीं खनिज तेलें होतीं व ४१ कोटि रुपयांची यंत्रसामुग्री होती. रसायनांची किंमत १४ कोटि रुपये भरली. खनिज तेलांची आयात सर्वस्वीं त्या कंपन्यांचे हातीं होती, तर रसायनें व वीज–साहित्य ह्यांच्या आयातीपैकीं ४०% आयात त्यांनींच केली.

## भारताच्या परराष्ट्रीय व्यापारांत विदेशी नियंत्रणाच्या कंपन्यांचा हिस्सा

( १९५६ )

निर्गत ( लक्ष रुपये )

| माल | एकूण खासगी व्यापारी निर्गत (१) | विदेशी कंपन्यांनीं केलेली निर्गत (२) | (२) चे (१)शीं प्रमाण % |
|---|---|---|---|
| १. अन्न पदार्थ, तंबाखू | | | |
| काजू | १५,९४ | २,२४ | १४·१ |
| चहा | १३९,४२ | १०१,६४ | ७२·९ |
| तंबाखू | १६,३६ | ७,२६ | ४४·४ |
| इतर | ३५,५० | ३,१९ | ९·० |
| एकूण | २०७,२२ | ११४,३३ | ५५·२ |
| २. कच्चा माल | | | |
| कच्चे धातू | २३,३५ | २,९६ | १२·७ |
| वनस्पति तेलें | २९,१६ | ३,७७ | १२·९ |
| कपास | २८,८७ | ५,०० | १७·३ |
| इतर | ९१,७६ | १६,७९ | १८·३ |
| एकूण | १७३,१४ | २८,५२ | १६,५ |
| ३. पक्का माल | | | |
| कातडीं | २३,८४ | ४,४९ | १८,८ |
| कपाशीचें सूत व कापड; | ७७,६८ | ४,९५ | ६·४ |
| ताग, सूत व कापड | १२२,११ | ३५,८२ | २९·३ |
| इतर | ५०,८९ | १२,२४ | २४·१ |
| एकूण | २७४,५२ | ५७,५० | २०·९ |
| इतर | ८,११ | — | — |
| एकूण | ६६२,९९ | २००,३५ | ३०·२ |

## भारताच्या परराष्ट्रीय व्यापारांत विदेशी नियंत्रणाच्या कंपन्यांचा हिस्सा

आयात ( लक्ष रुपये )

| माल | एकूण खासगी व्यापारी आयात (१) | विदेशी कंपन्यांनीं केलेली आयात (२) | (२) चें (१)शीं प्रमाण % |
|---|---|---|---|
| १. अन्नपदार्थ, तंबाखू | ३९,४४ | ४,९३ | १२·५ |
| २. कच्चा माल | | | |
| खनिज तेलें | ७४,१६ | ७२,३९ | ९७·६ |
| कपास | ५६,८२ | ५,१७ | ९·१ |
| ताग | १२,३१ | ६३ | ५·१ |
| इतर | ३६,४५ | ८,२४ | २२·६ |
| एकूण | १७९,७४ | ८६,४३ | ४८·१ |
| ३. पक्का माल | | | |
| रसायनें | ५७,२६ | २३,९१ | ४१·८ |
| कटलरी, हार्डवेअर | २७,३१ | ३,६६ | १३·४ |
| विजेचें साहित्य | २४,०१ | ११,०४ | ४६·० |
| मशिनरी | १८४,४६ | ४०,८८ | २२·२ |
| धातू | १४९,३३ | १४,२९ | ९·७ |
| इतर | १०९,९८ | ११,७७ | १०·७ |
| एकूण | ५५२,३५ | १०५,५५ | १९·१ |
| एकूण | ७७१,५३ | १९६,९१ | २५·५ |

## भारताची २० देशांशीं रेडिओ टेलिफोन व्यवस्था

भारतानें २० देशांशीं थेट रेडिओ-टेलिफोन व्यवस्था, १७ देशांशीं रेडिओ-टेलिग्राफ व्यवस्था व ७ देशांशीं रेडिओ-फोटो व्यवस्था प्रस्थापित केली आहे. या व्यवस्थेची वर्गवारी पुढें दिली आहे:—

**( १ ) रेडिओ टेलिफोन व्यवस्था**—एडन, ऑस्ट्रेलिआ, बहरीन, ब्रह्मदेश, चीन, पूर्व आफ्रिका, इजिप्त, इथिओपिआ, फ्रान्स, हाँगकाँग, इंडोनेशिआ, इराण, इंडो-चीन ( सायगांव ), जपान, मलाया, पोलंड, सौदी अरबस्तान, स्वित्झर्लंड, इंग्लंड ( तीन सर्किट ), व रशिआ.

**( २ ) रेडिओ-टेलिग्राफ व्यवस्था**— अफगाणिस्तान, ऑस्ट्रेलिआ, ब्रह्मदेश, चीन ( दोन सर्किट ), इजिप्त, फ्रान्स, इंडो-चीन ( हनोई ), इंडो-चीन ( सायगांव ), इंडोनेशिआ, इराण, जपान, पोलंड, थायलंड, इंग्लंड ( तीन सर्किट ), अमेरिका ( दोन सर्किट ), रशिआ व युगोस्लाव्हिआ.

**रेडिओ-फोटो व्यवस्था**— चीन, फ्रान्स, जपान, पोलंड, इंग्लंड ( दोन सर्किट ), अमेरिका, रशिआ.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत या तीनहि व्यवस्थांच्या विकास कार्यक्रमांकरतां १·१५ कोटी रु., परकीय हुंडणावळीसुद्धां एकूण २ कोटी रु. खर्च येईल

या कार्यक्रमांत आतांपर्यंत वरीलप्रमाणें व्यवस्था नसलेल्या देशांशीं तशी व्यवस्था सुरू करणें, नवी दिल्ली व मद्रास येथें नवीन दूर संदेश व्यवहार केंद्रें सुरू करणें व मुंबई येथील अशा केंद्रांचें आधुनिकीकरण करणें, वार्षिक भाड्यानें रेडिओ टेलिग्राफची ( डुप्लेक्स ) सोय करणें, विविध ठिकाणांसाठीं होणाऱ्या सध्यांच्या वृत्त ध्वनिक्षेपण व्यवस्थेचा विकास करणें इ. चा समावेश होतो.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत खालील देशांशीं पुढीलप्रमाणें थेट दळणवळण व्यवस्था केली आहे.

**रेडिओ-टेलिफोन व्यवस्था** :—ऑस्ट्रेलिया, इथिओपिआ, फ्रान्स, सौदी अरबस्तान व इंग्लंड ( नवी दिल्ली येथून )

**रेडिओ-टेलिग्राफ व्यवस्था** :—इजिप्त, फ्रान्स व इंडो-चीन ( हनोई )

**रेडिओ-फोटो व्यवस्था** :—फ्रान्स, जपान व पोलंड.

पुढील विभाग कंपन्यांमार्फत थेट रेडिओ टेलिग्राफ ( डुप्लेक्स ) व्यवस्था करण्यांत आली आहे.

बी. ओ. ए. सी.—कलकत्ता ते लंडन.

पी. ए. ए.—कलकत्ता ते लंडन.

एअर इंडिआ इंटर नॅशनल—मुंबई ते पॅरिस.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत बाकीचा कार्यक्रम पूर्ण करणें परकीय हुंडणावळ मिळण्यावर अवलंबून राहील.

## कापसाच्या लागवडीच्या क्षेत्रांत वाढ

भारतांत १९५७-५८ मध्यें १,९२,११,००० एकरांत कपाशीच्या पिकाची लागवड झाली असावी असा मध्यवर्ति अन्न आणि शेतकी खात्याच्या या पिकांबाबतचा अ. भा. दुसरा अंदाज आहे. १९५६-५७ मधील हाच आंकडा १,९०,१८,००० एकर होता. यावरून गेल्या वर्षीपेक्षा यंदा १,९३,००० एकरांनीं किंवा १·२ टक्क्यानें वाढ झाल्याचें दिसून येईल.

लागवडीच्या क्षेत्रांतील ही वाढ प्रामुख्यानें मुंबई आणि पंजाब या राज्यांत झाली असून पेरणीच्या वेळीं अनुकूल असलेलें हवामान त्यास कारणीभूत आहे.

मध्यप्रदेश आणि म्हैसूर या राज्यांत मात्र लागवडीच्या क्षेत्रांत घट झाली.

## महाराष्ट्रांतील साखर कारखानदारांपुढील प्रश्न

### डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशनच्या १८ व्या वार्षिक सभेंत अध्यक्ष, श्री. एफ. एडवर्डस, ह्यांचें भाषण

आपल्या असोसिएशनच्या ह्या १८ व्या सर्वसाधारण वार्षिक सभेला उपस्थित असणाऱ्या सभासदांचें स्वागत करण्यास मला फार आनंद होत आहे. ह्या वर्षी भारतामधील साखरेच्या उत्पादनानें उच्चांक गांठला आहे. साखरेचें उत्पादन २०.२ लाख टन झालें. मुंबई राज्यांतील कारखान्यांनीं ह्या वर्षी २.४१ लाख टन साखर तयार केली. गेल्या वर्षीच्या उत्पादनाचा आंकडा २.०२ लाख टन असा आहे. मुंबई व इतर राज्यांत आणखी कारखाने स्थापन करण्यांत येत आहेत. त्यामधून उत्पादन होऊं लागलें म्हणजे दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ठरविलेलें २२.५ लाख टनांचें उद्दिष्ट गांठणें फारसें अवघड जाणार नाहीं असें मला वाटतें.

### निर्गतीस उत्तेजन हवें

ह्यां सालीं भारताला बरीच साखर परदेशीं निर्यात करतां आली ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. साखरेच्या आंतरराष्ट्रीय किंमतींत योग्य वेळीं वाढ झाल्यामुळें निर्यात करणें शक्य झालें ही गोष्ट खरी असली तरी ह्या घटनेचें महत्त्व कमी लेखून चालणार नाहीं. साखरेची निर्यात करण्याचा मक्ता एकाच संघटनेकडे असावा कीं कारखान्यांना व व्यापाऱ्यांनाहि तींत भाग घेण्याची मुभा असावी ह्यासंबंधीं वाद आहेत. मला स्वतःला असें वाटतें कीं दुसरा पर्याय राज्यघटनेंतील व्यापार-स्वातंत्र्याच्या कल्पनेशीं अधिक सुसंगत आहे. सध्यां जगांतील साखरेच्या किंमती उतरत आहेत. अशा वेळीं तरी कारखानदारांना कराच्या बाबतींत सवलती देऊन परदेशी साखर विकण्यास उत्तेजन द्यावें आणि अत्यंत जरूर असलेलें परदेशी चलन मिळवावें.

### भय सूचना

साखरेची निर्यात करण्याचा प्रश्न हा केवळ आजच उपस्थित झालेला असा रहाणार नाहीं. पुढील कांहीं वर्षांत तो अधिकच बिकट होण्याचा संभव आहे. कारण, साखरेची निर्यात करणाऱ्या प्रमुख देशांनीं जर भारताला निर्यात करूं न देणाचें आपसांत ठरविलें तर भारताला तसें करणें अशक्य नाहीं. तरी कठीण होईल. त्या देशांतील साखरेच्या उत्पादनाची किंमत भारतामधील उत्पादनाच्या किंमतीच्या मानानें अत्यल्प आहे. त्यामुळें किंमती कमी ठेवून भारताला बाजारपेठांतून हुसकणें त्यांना सहज शक्य आहे. मग भारताला आपल्या साखरेचा नाश तरी करावा लागेल अगर ती अक्षरशः मातीमोलानें विकावी तरी लागेल. ह्या संभाव्य घटनेकडे भारत सरकारचें दुर्लक्ष नसेल अशी मला आशा आहे. असें झाल्यास परदेशीय चलन मिळविण्याचा हेतु पूर्णपणें अयशस्वी होईल. म्हणून भारतामधील साखरेच्या उत्पादनाची किंमत कमी करण्यासाठी तावडतोबीचे उपाय संपूर्णतः अंमलांत आणले पाहिजेत. निरनिराळ्या भागांतील जमिनींना योग्य व साखरेचें प्रमाण जास्त असलेल्या उसाचें संशोधन करण्यासाठी जारीनें संशोधन करणें अगत्याचें आहे. पाणी देण्याची पद्धत आणि लागवडीची पद्धत ह्यांचाहि काळजीपूर्वक अभ्यास करण्यांत आला पाहिजे. अशा कामामुळें चांगलें फळ मिळतें हें मुंबई राज्यांतील कारखान्यांच्या अनुभवावरून उघड झालें आहे. ह्या वर्षी अबकारी करांत १०० टक्के वाढ झालेली असतांनासुद्धां गेल्या वर्षीच्या मानानें साखरेच्या किंमतींत इतर पदार्थांच्या किंमतीच्या मानानें बेताचीच वाढ झालेली आहे.

### खताचा तुटवडा

चालू वर्षी दरएकरीं झालेल्या उसाचें सरासरीं प्रमाण मागील वर्षाच्या मानानें थोडें कमी आहे. त्याचप्रमाणें साखरेच्या उताऱ्याची सरासरी टक्केवारीहि कमी झाली आहे. गेल्या वर्षी ती ११.७४ टक्के होती. ह्या वर्षी ११.६२ टक्के आहे. हा फरक हवापाण्यामुळें झालेला आहे. त्याचा कार्यक्षमतेशीं कांहीं संबंध नाहीं. उसासाठी लागणारें अमोनिअम सल्फेट मुंबई सरकारकडून अनियमितरीत्या व अपुऱ्या प्रमाणांत पुरविलें गेलें. ह्या-खताचा तुटवडा असल्यामुळें मुंबई सरकारनें अशी अट घातली आहे कीं अमोनियम सल्फेटच्या किंमती इतकेंच मलमूत्राचें खत घेतलें पाहिजे. माझ्या मतानें ही अट निराशाजनक आहे. मलमूत्राच्या खताचा उपयोग सक्तीचा केल्यानें उसाच्या पिकावर विपरीत परिणाम होऊन साखरेचें उत्पादन घटण्याचा संभव आहे. सरकार ह्या बाबतींत फेरविचार करील अशी आशा आहे.

### मळीचा प्रश्न

असोसिएशनचे सभासद असलेल्या कारखान्यांपुढें आणखी एक चिंताजनक प्रश्न आहे. तो म्हणजे कारखान्यांजवळ मोठ्या प्रमाणांवर सांठलेली मळी. आतां पुन्हां नव्या हंगामाला सुरवात झाली आहे. त्यामुळें मळीच्या साठ्यांत आणखी भर पडणार आहे. बऱ्याच कारखान्यांजवळ मळी साठविण्याची व्यवस्था नाहीं. पावसाळ्यांत नद्यांना पूर आल्यावर मळी पात्रांत फेकून देण्याची परवानगी देण्यांत आली आहे. पण त्यामुळें कारखान्यांना फारसा दिलासा मिळालेला नाहीं. कारण, दारूबंदी-खातें आणि पाटबंधारे-खातें ह्यांनीं ह्यासंबंधीं बरेच निर्बंध घातलेले आहेत. कांहीं विशिष्ट प्रकारच्या भट्ट्या वापरल्या तर मळीचा जळणासारखा उपयोग करतां येईल. पण हें प्रमाण अगदींच बेताचें असेल. शिवाय, कारखाने चालू असतांनाच तें करणें शक्य होईल. ही परिस्थिति दारूबंदीखात्याच्या नजरेला आणलेली आहे. सरकार हा प्रश्न सोडविण्यासाठी योग्य उपाय योजील अशी आशा आहे.

### मजूरविषयक परिस्थिति

साखर कारखान्यांतील मजूरविषयक परिस्थिति शांत व समाधानकारक होती. साखर धंद्याच्या रोजगार बोर्डापुढें वेतनासंबंधींचे व इतर अनेक औद्योगिक तंटे निर्णयासाठी होते. त्यापैकी बहुतेक तंटे कामगार-संघ आणि चालक ह्यांच्यांत करार करून मिटविण्यांत आले. बाकीचेहि असेच मिटविण्यांत येण्याचा संभव आहे. वेतनाच्या नव्या श्रेणीमुळें कारखान्यावर बराच ताण पडला आहे. तथापि मला अशी बळकट आशा वाटते कीं, मजूर वर्ग आतां उत्पादनाकडे अधिक लक्ष देईल आणि धंद्याच्या आर्थिक भरभराटीला हातभार लावील. वेतनांत वाढ व्हावयाची असेल तर प्रत्येक कामगारामागें अधिक उत्पादन झालें पाहिजे व कार्यक्षमता वाढली पाहिजे हें उघडच आहे. असोसिएशन आतां इंडियन ट्रेड युनियन ॲक्टखालीं नोंदण्यांत आली आहे. सभासदांना उपयुक्त वाटेल अशी सेवा असोसिएशन करीत आहे. त्यांच्याकडून येणाऱ्या प्रश्नांचा ते वेळोवेळीं विचार करीत असते. तथापि, असोसिएशनच्या कार्याचा व्याप व उपयुक्तता ह्या दोन्हींत वाढ करण्यास अद्याप चांगला वाव आहे असें मला वाटतें. सभासदांकडून ह्या दृष्टीनें सूचना आल्यास त्या स्वागतार्हच होतील. कारण, मुंबई राज्यांतील साखरेचा धंदा विस्तार पावत असल्यामुळें असोसिएशनला आणखीहि महत्त्वाचें कार्य करावें लागेल असा संभव आहे.

## उत्तर सातारा जिल्हा चेंबर ऑफ कॉमर्स

६९, शनिवार पेठ, सातारा.

### उद्देश व नियम

संस्थेचें नांव "उत्तर सातारा जिल्हा चेंबर ऑफ कॉमर्स" असें राहील.

उत्तर सातारा जिल्ह्यांतील व्यापारी, व्यापारी पेढ्या, जॉईंट स्टॉक कंपन्या, उत्पादन करणाऱ्या संस्था व व्यक्ती, वहातुकीचा व्यवसाय करणाऱ्या व्यक्ती व पेढ्या, वगैरे सर्वांना या संस्थेचे सभासद होतां येईल.

### उद्देश

(ए) सातारा जिल्ह्यांतील व्यापारी, व्यापारी पेढ्या, जाईंट स्टॉक कंपन्या, उत्पादन करणाऱ्या संस्था व व्यक्ती, वहातुकीचा व्यवसाय करणाऱ्या व्यक्ती व पेढ्या, वगैरे सर्वांना एकत्र आणून परस्परांमध्यें सहकार्य निर्माण करून सर्वांच्या हिताकरितां संघटना निर्माण करणें.

(बी) सातारा जिल्ह्यांतील व्यापारी, कारखानदार व इतर व्यवसाय करणाऱ्या सर्वांचें प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष हित साधण्या-करितां संघटित रीतीनें प्रयत्न करणें.

(सी) सातारा जिल्ह्यामध्यें नवीन लहानमोठे उद्योगधंदे निघण्याचे दृष्टीनें सर्व प्रकारची माहिती मिळवून, त्यास संघटित चालना देणें.

(डी) सातारा जिल्ह्यांतील व्यापारविषयक कार्याची वाढ करण्याकरितां त्यास उपयुक्त अशा सर्व प्रश्नांसंबंधीं माहिती गोळा करून व एकत्रित करून त्याचा प्रचार करणें.

(इ) सरकारी कायदेकानू, म्युनिसिपालिटीज, लोकलबोर्ड व पंचायती यांचे कायदेकानूसंबंधीं संपूर्ण माहिती मिळवून व्यापारीवर्गाचे हितसंबंधांचें संरक्षण करण्याचा प्रयत्न करणें.

(एफ्) ज्या ज्या वेळीं नवीन कायदेकानू होतील त्यावेळीं व्यापारी वर्गाचे हितास बाध न येईल अशा सुधारणा घडवून आणण्याकरितां संघटित प्रयत्न करणें.

(जी) व्यापारवृद्धीसाठी जरूर ती माहिती मिळवून व त्यास सरकारी संरक्षण व मदत मिळवून देण्याचा प्रयत्न करणें.

(एच्) वरील सर्व उद्देशांच्या पूर्ततेसाठी अर्ज करणें, प्रचार करणें, शिष्टमंडळ पाठविणें व त्याच अनुसंधानें इतर कार्यें करणें.

(आय्) वरील उद्देशांच्या पूर्ततेसाठी आज अस्तित्वांत असलेल्या व पुढें अस्तित्वांत येणाऱ्या, आपल्या संस्थेच्या उद्देशास बाध न येईल, अशा संस्थांशीं सहकार्य करणें.

(जे) व्यापारी अगर कारखानदार यांचा संबंध ज्या अनेक कायद्यांशीं येतो (नोकरविषयक, मजूरविषयक, फॅक्टरी ॲक्ट, इलेक्ट्रिकसिटी, बॉयलर इत्यादि) अशा सर्व विषयांबद्दल संस्थे-मार्फत त्यांना मदत करणें.

(के) सेलसटॅक्स, इन्कमटॅक्स, आदि कायद्यांची माहिती व्यापाऱ्यांना सांगून त्यांचे व्यवहारांत मदत करणें.

(एल्) वरील सर्व उद्देशांस प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीनें पोषक होणाऱ्या सर्व गोष्टी करणें.

### सभासदत्व व वर्गणी

या संस्थेचे १ आश्रयदाते २ तहहयात सभासद ३ सर्व-साधारण सभासद व ४ सलग्न सभासद, असे चार प्रकारचे सभासद राहतील.

सातारा जिल्ह्यांतील व्यापारी, कारखानदार, खाजगी कंपनी, जॉईंट स्टॉक कंपनी अगर संघ, उत्पादन करणाऱ्या व्यक्ती व संस्था तसेंच ह्या सर्वांशीं हितसंबंध असणारे ह्या सर्वांस संस्थेचे सभासद होतां येईल. मात्र प्रत्येक संस्थेमार्फत एकच प्रतिनिधी नेमून घेतां येईल.

सभासदांची वार्षिक वर्गणी खालीलप्रमाणें राहील.

| | |
|---|---|
| (अ) आश्रयदाते | रु. ५०१ |
| (ब) तहहयात सभासद | रु. १५१ |
| (क) सर्वसाधारण सभासद | |
| १. उत्पादन संस्था अगर जॉइंट स्टॉक कंपन्या वार्षिक | रु. २० |
| २. व्यक्ती अगर भागीदारी फर्मस वगैरे वार्षिक | रु. १० |

कार्यकारी मंडळ हे अध्यक्ष, उपाध्यक्ष, चिटणीस मिळून ११ सभासदांचें राहील व ही निवडणूक वार्षिक सर्वसाधारण सभेंत सभासदांनीं करावयाची आहे.

### कार्यकारी मंडळ

अध्यक्ष: श्री. रा. ना. गोडबोले, B. A., B. Com., C. A. I. I. B.

उपाध्यक्ष: श्री. धोंडूसा सितारामसा पवार, व्यापारी, सातारा. श्री. निळकंठराव आण्णाप्पा कल्याणी, व्यापारी, कराड, श्री. गंगाराम कामचंद दोशी, व्यापारी, फलटण.

सभासद: श्री. ल. अ. जाजू, B.A., LL. B. वकील, सातारा, श्री. विष्णुपंत कुलकर्णी, बर्माशेल एजंट, कऱ्हाड, श्री. एम्. एस्. दोशी, जनरल मॅनेजर, कूपर इंजिनियरिंग लि., सातारारोड, श्री. कांतीलाल मनसुखलाल शहा, व्यापारी, सातारा, श्री. किसनदास लक्ष्मणदास दोशी, व्यापारी, सातारा.

चिटणीस: श्री. इब्राहिम रसूल बागवान, B. A., LL. B. वकील, सातारा, श्री. चतुरभुज हरिराम झंवर, व्यापारी, सातारा.

---

## हातमाग धंद्याच्या विकासासाठी भारत सरकारचें साह्य

रेशीम, लोंकर व कापूस हातमाग धंद्याच्या विकासाकरितां निरनिराळ्या राज्यांतील अनेक योजनांस भारत सरकारनें मंजुरी दिली असून या योजनांच्या अंमलबजावणीसाठी मध्यवर्ति व्यापार व उद्योग खात्यानें, सुमारें ८२·५ लाख रुपये मंजूर केले आहेत.

विणकरांस सहकारी संस्थांत सामील होतां यावें म्हणून यांच्या भागभांडवलार्थ त्यांस आर्थिक साह्य देणें, रंगकेंद्रें व विक्रीकेंद्रें स्थापणें, हातमागी कापडाच्या विक्रीवर रिबेट देणें, उत्पादन वाढीसाठी विणकरांस सुधारलेल्या साहित्यांचा पुरवठा करणें इत्यादींचा या योजनांत समावेश होतो.

या योजनांनुसार म्हैसूर, आंध्र, मध्य प्रदेश, आसाम, मद्रास, दिल्ली, इत्यादि राज्यांतील २६,००० हातमाग विणकरांस सहकारी संस्थांत सामील होण्यासाठी कर्जें देण्यांत येतील. त्याचप्रमाणें हातमाग कापडाच्या विक्रीवर सूट देण्यानें येणारी तूट भरून काढण्यासाठी मद्रास ३६ लक्ष रु., उत्तर प्रदेश १५ लक्ष रुपये, म्हैसूर ९ लक्ष रुपये, केरळ ५·२५ लक्ष रुपये, मध्यप्रदेश ४·५ लक्ष रुपये व आसाम १·७५ लक्ष रुपये याप्रमाणें कांहीं राज्यांना आर्थिक साह्य देण्यांत आलें.

मुंबई राज्यास कोल्हापूर जिल्ह्यांतील समाज-विकास योजना विभागांत दोन विक्रीकेंद्रें उघडण्यासाठी व हातमाग धंद्यासंबं-धींची आंकडेवारी संकलित करण्यासाठी आर्थिक मदत मिळेल.

## रिझर्व्ह बँकेचें नफा–तोटा खातें

| | जून ३०, १९५७ अखेरचें वर्ष | जून ३०, १९५६ अखेरचें वर्ष | जून ३०, १९५५ अखेरचें वर्ष |
|---|---|---|---|
| उत्पन्न | रु. | रु. | रु. |
| व्याज, डिस्कौंट, एक्सश्चेंज, कमिशन इ. | ३६ २०,५३,२४५ | २५,४४,५०,८६६ | २५,०१,०५,५५० |
| खर्च | | | |
| पगार | ३,१८,६१,१२४ | २,९८,१८,७२३ | २,८२,२८,३४४ |
| डायरेक्टर इ. च्या फी व इतर खर्च | ८०,३६३ | ६९,४६१ | ७९,९१९ |
| ऑडिटरांची फी | २२,५०० | २२,५०० | २२,५०० |
| भाडें, कर, विमा, दिवाबत्ती | १६,६२,४७६ | १४,०६,१२७ | १३,३०,५५० |
| कायदेविषयक खर्च | ३०,३७२ | ६७,५५३ | ७७,०५९ |
| पोस्टेज, तार | २,५८,९१५ | २,१८,८५३ | १,९५,८०० |
| पैशाची वर्गावर्गी | २६,२४,४६६ | १९,४५,००७ | १५,३०,८९७ |
| स्टेशनरी | ५,९६,२६३ | ५,९८,९६१ | ६,१५,४८१ |
| सिक्युरिटी छपाई | १,३८,५२,२१४ | १,१०,३३,९४५ | १,०६,६८,११७ |
| घसारा दुरुस्ती | २५,३०,१७६ | १५,६४,८७४ | १५,३०,४०० |
| एजन्सी खर्च | ६६,०८,८५८ | ६२,४१,२५० | ४६,८१,६९५ |
| स्टाफ फंड | ३६,००० | ४५,००० | ५५,००० |
| इतर खर्च | १८,७५,६४४ | १४,१०,६८८ | १०,७८,८१६ |
| शिल्लक | ३०,००,१३,८७० | २०,००,०७,९१९ | २०,००,१०,९७४ |
| एकूण | ३६,२०,५३,२४५ | २५,४४,५०,८६६ | २५,०१,०५,५५० |
| मध्यवर्ती सरकारला दिले | ३०,००,१३,८७० | २०,००,०७,९१९ | २०,००,१०,९७४ |
| पुढील हिशेबांत ओढले | ० | ० | ० |


# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना : १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

टेलिफोन नं. २५५४७४–७५ | चेअरमन– श्री. रमणलाल जी. सरैय्या | पोस्ट बॉक्स नं. ४७२ तारेचा पत्ता–फार्मर बँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

भागीदारांतर्फे रु. ४४,११,५००

मुंबई सरकारतर्फे रु. ३१,००,०००

रु. ७१,११,५००

गंगाजळी व फंड रु. ५९,२८,१००

ठेवी रु. १०,७१,३३,०००

खेळतें भांडवल रु. १७,६३,७३,०००

## ११ जिल्ह्यांमध्यें ५६ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.



स्थापना १९३६

# युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*

शाखा–मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी

ता. ३०–६–५७ असेर

अधिकृत भांडवल रु. १०,००,०००
वसूल भांडवल रु. ६,५०,०००
रिझर्व व इतर फंडस् रु. ३,०३,०००
ठेवी व इतर फंडस् रु. १,२५,००,०००
एकूण खेळतें भांडवल रु. १,४०,००,०००

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

१ वर्ष ते दोन वर्षें रु. ३–०–० | तीन वर्षें रु. ३–४–० | ५ वर्षें रु. ३–८–०

दहा अगर अधिक वर्षें रु. ४–०–० (चार फक्त)

सेव्हिंग्ज बँक दरसाल दर शेंकडा २–०–०
सेव्हिंग्ज डिपॉझिट " २–८–०
चालू डिपॉझिट " ०–८–०

सेव्हिंग्ज बँक व से. डिपॉझिट खात्यावर नवीन आकर्षक नियम तयार केले असून व्याजाचे दरांतहि वाढ केली आहे. त्याबद्दलची सविस्तर माहिती आमचे कोणत्याहि शाखेंत समक्ष मिळूं शकेल.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. | शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

## मुंबई राज्य सहकारी युनियन

चेअरमन, श्री. वैकुंठभाई मेहता, ह्यांचा आढावा

बॉंबे स्टेट को. युनियनची ३९ वी वार्षिक सभा दि. १३ रोजीं मुंबई येथें भरली होती. त्यावेळीं युनियनचे चेअरमन, श्री. वैकुंठभाई मेहता, ह्यांनीं आपल्या भाषणांत युनियनच्या कार्याचा थोडक्यांत आढावा घेतला. युनियनचा संबंध सौराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा येथील तत्सम संस्थांशीं जोडावा लागला. सबंध मुंबई राज्याकरितां एक केंद्रीय संस्था असावी, हें तत्त्व सर्व विभागांनीं मान्य केलें आहे. विभागीय संस्था बॉंबे स्टेट को. युनियनमध्यें लवकरच सामील होतील. पुणें येथील को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग कॉलेजची प्रगति चांगली असून तें कॉलेज स्वतःची परंपरा निर्माण करण्याइतके दिवस अस्तित्वांत आहे. सहकारी मार्केटिंगच्या शिक्षणाची व्यवस्थाहि त्या कॉलेजांत करण्यांत आली आहे. सध्यां दोन सहकारी शाळा चालू आहेत. एकींत मराठी व एकींत गुजराती माध्यम आहे. आतां मुंबई शहरासाठी इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करण्यांत आली आहे.

प्राथमिक सोसायट्यांचे सेक्रेटरी, पदाधिकारी व सभासद ह्यांच्या पद्धतशीर शिक्षणाची व्यवस्था मुंबई राज्यासारखी दुसऱ्या कोणत्याहि राज्यांत नाहीं. त्या व्यवस्थेंत आणखी सुधारणा होऊन, प्रत्येक सभासदापर्यंत सहकारी शिक्षणाचा संदेश पोंचला पाहिजे. सहकारी शिक्षणाचा सर्व थरांत प्रसार झाला, म्हणजेच सहकारी चळवळीकडे जनता आकृष्ट होईल. नॅशनल को. डेव्हलपमेंट अँड वेअरहाऊसिंग बोर्डाची आणि नॅशनल वेअरहाउसिंग कॉर्पोरेशनची स्थापना, ह्या गेल्या वर्षांतील दोन महत्त्वाच्या घटना होत. शेतमालाला गुदामांच्या सोईची अत्यंत गरज आहे; तेव्हां हीं गुदामें मुख्यतः ग्रामीण विभागांतूनच उघडलीं जावींत. कमी ऐपतीच्या शेतकऱ्यासहि ह्या गुदामांचा फायदा घेतां यावा, अशी व्यवस्था हवी. सहकारी साखर कारखाने व सहकारी आदिवासी सोसायट्या ह्यांची प्रगति इष्ट प्रकारें होत आहे. अन्नपरिस्थिति कठीण होत चालली आहे. त्यामुळें सरकारला कांहीं अन्नधान्यांचें नियंत्रित वांटप करावें लागत आहे. सहाजिकच, सहकारी ग्राहक सोसायट्यांकडेच तें काम सोंपविलें जाण्याविषयीं सरकारशीं वाटाघाटी चालू आहेत. ह्या सोसायट्यांना जनतेची सेवा करण्यास मिळेल, त्याबरोबरच पूर्वीपेक्षा अधिक कार्यक्षमतेनें व सुदृढ पायावर त्या सोसायट्यांचा कारभार होईल अशी अपेक्षा आहे.

**मालवहातुकीच्या डब्यांचा कारखाना**—राजस्थानमध्यें भरतपूर ह्या ठिकाणीं रेल्वेच्या मालवाहतुकीच्या डब्यांचा एक खाजगी कारखाना उभारण्यांत येत आहे. कारखाना पुढील वर्षाच्या ऑक्टोबरपासून उत्पादनास प्रारंभ करील, असा अंदाज आहे. दरसाल सुमारें १,००० मालडबे तयार करण्यांत येतील.

**अमेरिकन अर्थशास्त्रज्ञाचें मत**—हारवर्ड विद्यापीठांतील माजी अमेरिकन प्रोफेसर हॅन्सेन ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, येत्या ३० वर्षांत भारताची लोकसंख्या ३० कोटींनीं वाढेल. म्हणून, अन्नाची टंचाई टाळण्यासाठी लोकसंख्येवर नियंत्रण ठेवून दर एकरीं पिकांत वाढ करण्यांत आली पाहिजे.

**नोबेल पारितोषकांचें वितरण**—स्वीडनच्या राजेसाहेबांनीं पांच शास्त्रज्ञांना नोबेल पारितोषकें समारंभपूर्वक बहाल केलीं. ह्या पांचांपैकीं दोघेजण चिनी असून ते अमेरिकेंतील विद्यापीठांतून पदार्थविज्ञानासंबंधीं संशोधन करीत आहेत. दोन्ही शास्त्रज्ञांचें वय तिशाच्या आंतील आहे.

## तुमचें स्थान कोणतें ?

लेखक व प्रकाशक—श्री. वा. काळे, दुर्गाधिवास, ८२३ शिवाजीनगर, पुणें ४. मूल्य दोन रुपये.

'अर्थ' साप्ताहिकाचे संपादक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं अर्थशास्त्री या नात्यानें जो लौकिक संपादन केला आहे त्यांत त्यांच्या 'कण आणि क्षण' या सुंदर पुस्तकानें एवढी मोठी निमौलिक भर घातली आहे कीं, ते आतां 'व्यवहारशास्त्री' म्हणून महाराष्ट्र नि महागुजरात या दोन्ही प्रांतांत मान्यता मिळवून राहिले आहेत. 'कण आणि क्षण' या पुस्तकाच्या मराठी नि गुजराथी भाषेंत दोन आवृत्त्या निघाल्या असून, त्यांचें दुसरे भावंड 'पुढे पाऊल' याचा गुजराथी अनुवाद प्रसिद्धीच्या वाटेवर आहे. अशा आंतरप्रांतीय मान्यतेच्या लेखकाचें पुस्तक 'तुमचें स्थान कोणतें ?' हें आहे. ही एकच गोष्ट त्याच्या चांगुलपणाची, उपयुक्ततेची व वाचनीयतेची खात्री बाळगण्यास पुरेशी आहे.

हरघडी आपल्या कौटुंबिक नि सामाजिक जीवनांत अनेक प्रकारच्या घटना घडतात नि प्रसंग ओढवतात. त्या त्या वेळीं कसें वागणें स्वतःच्या हिताचें व आपल्या समाजाच्या आणि आपल्या देशाच्याहि कल्याणाचें आहे, याचें व्यावहारिक मार्गदर्शन या पुस्तकांतील एकंदर एकोणीस विषयांच्या चर्चेच्या निमित्तानें लेखकानें केलेलें आहे. श्री. काळे यांची भाषा सुबोध व विषयविवेचन चटकदार आहे. प्रौढ विद्यार्थीवर्गच नव्हे तर वयस्क स्त्रीपुरुषांनीहि हें पुस्तक वाचण्यासारखें आहे.

— "गर्जना", कोल्हापूर, १३-१२-५७


आर्थिक व्यवहारांचे सौकर्यासाठी प्रतिष्ठित व कार्यक्षम बँकेंत आपलें खातें हवें.

दि

**बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

स्थापना १९३५ : शेड्यूल्ड बँक

कारखानदार, व्यापारी व इतर जनता यांच्या सेवेस सिद्ध आहे. नवीन वर्षापासून बँकिंगच्या विविध व्यवहारासाठी महाराष्ट्र बँकेचा उपयोग करून घ्या.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. २१,००,०००चे वर |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. १०,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. साडेआठ कोटींचे वर |

मागासलेल्या मराठवाड्याकडे लक्ष देण्याच्या उद्देशानुसार महाराष्ट्र बँकेनें लातूर, हिंगोली, मोमिनाबाद, औरंगाबाद, जालना, नांदेड व द. हैद्राबाद येथें चालू केलेल्या शाखांचा संबंधी जनतेनें फायदा घ्यावा.

चौकशी : स्थानिक शाखाधिकारी वा मुख्य कचेरी.

मुख्य कचेरी, पुणें २. चिं. वि. जोग, मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.